# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:26.02.2026** **वारः गुरुवार**

१) दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारत इस्राईलसोबत खंबीरपणे उभा आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची इस्त्राइलच्या संसदेत ग्वाही

२) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'स्पीकर ऑफ द नेसेट मेडल' हा इस्राईली संसद नेसेटचा सर्वोच्च सन्मान प्रदान

३) रोगाला प्रतिबंध करणं हे केवळ व्यक्तीसाठी लाभदायक नाही तर त्यामुळं देशाच्या आरोग्य व्यवस्थेवरील भार देखील कमी होतो असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं प्रतिपादन

४) लाल किल्ला बॉम्बस्फोटप्रकरणी आणखी दोन जणांना राष्ट्रीय तपास यंत्रणेकडून अटक

आणि

५) क्रिकेट विश्वचषकातील आव्हान टिकवून ठेवण्याकरीता भारतासाठी आज महत्वाचा सामना.

**<u>भारत- इस्त्राईल</u>**

दहशतवादाविरुद्धच्या लढाईत भारत इस्राईलसोबत खंबीरपणे आणि पूर्ण विश्वासानं उभा आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल इस्रायलची संसद नेसेटमध्ये केलेल्या भाषणात सांगितलं. इस्राईलवर हमासनं केलेल्या हल्ल्याचा त्यांनी निषेध केला. संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेनं मंजूर केलेल्या गाझा शांतता उपाययोजना या प्रदेशात शांतता निर्माण करण्याचा उल्लेखनीय मार्ग असून, भारताचा याला पूर्ण पाठिंबा असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं. आपण भारतातील १० कोटी जनतेच्या शुभेच्छा आणि मैत्री, आदर आणि सहकार्याचा संदेश सोबत आणला आहे. ज्यू समुदाय कोणत्याही भेदभावाच्या भीतीशिवाय भारतात राहत आहे, असंही पंतप्रधान मोदी यांनी नमूद केलं. दरम्यान, आज पंतप्रधान नरेंद्र मोदी इस्राईलचे राष्ट्रपती इसहाक हर्जोग यांची भेट घेणार असून, दोन्ही देशांत विविध क्षेत्रातील करार होण्याची शक्यता आहे.

**<u>नेसेट पदक</u>**

दरम्यान, भारत आणि इस्राईलमधील धोरणात्मक संबंध मजबूत करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना 'स्पीकर ऑफ द नेसेट मेडल' हा इस्राईली संसद नेसेटचा सर्वोच्च सन्मान

प्रदान करण्यात आला. हे पदक मिळवणारे ते पहिले भारतीय पंतप्रधान आहेत. पंतप्रधान मोदी यांनी इस्रायली संसदेत केलेल्या भाषणानंतर नेसेटचे सभापती अमीर ओहाना यांनी हा पुरस्कार प्रदान केला.

हा सन्मान भारत आणि इस्राईलमधील शाश्वत मैत्रीचा सन्मान आहे, मी अतिशय नम्रतेनं आणि आदरानं याचा स्वीकार करतो, असं पंतप्रधानांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

दरम्यान, हा प्रत्येक भारतीयासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. आपल्या पंतप्रधानांच्या राजकीय कौशल्याचा हा सन्मान आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे.

**<u>परराष्ट्र मंत्रालय</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी काल अत्याधुनिक इस्रायली तंत्रज्ञानाचे प्रदर्शन घडविणाऱ्या जेरुसलेममधील एका विशेष प्रदर्शनाला भेट दिली. शेती, कृत्रिम बुद्धीमत्ता यासह अनेक क्षेत्रातील नावीन्यपूर्ण संशोधनामुळे भारतात कृषी उत्पादकता वाढवणे, ग्रामीण आरोग्यसेवा सुधारणे, सायबर सुरक्षितता भक्कम करणे, क्वांटम संशोधन पुढे नेणे तसंच शाश्वत पाणी आणि हवामान उपाय सक्षम करणे यासाठी मोठी मदत होईल, असं पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

**<u>मुर्मू-बुलढाणा</u>**

आयुर्वेद, योग आणि इतर आयुष प्रणाली केवळ रोगांवर उपचार करण्यापुरत्या मर्यादित नाहीत तर त्या समग्र आरोग्य व्यवस्थापनाचे शास्त्र असल्याचं प्रतिपादन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं आहे. बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव इथं चार दिवसांच्या राष्ट्रीय आरोग्य मेळ्याचे उद्घाटनप्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना त्या काल बोलत होत्या. आयुष मंत्रालय आणि अखिल भारतीय आयुर्वेदिक काँग्रेसच्या सहकार्याने याचं आयोजन करण्यात आलं आहे. रोगाला प्रतिबंध करणे हे केवळ व्यक्तीसाठी लाभदायक नाही तर देशाच्या आरोग्य व्यवस्थेवरील भार देखील कमी करते, असंही त्यांनी सांगितलं.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या उपस्थितीत काल नागपूरमधील विश्व शांती सरोवर इथं ब्रह्माकुमारीज यांच्या वतीनं आयोजित केलेल्या 'एकता आणि विश्वासाच्या माध्यमातून महाराष्ट्राचे सुवर्णयुग' कार्यक्रमाचा राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला. यावेळी राष्ट्रपती म्हणाल्या की, महाराष्ट्रानं देशात सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक विकासाची उदाहरणे सातत्याने ठेवली आहेत. ही पवित्र भूमी भारतातील लोकांमध्ये नवीन चेतना निर्माण करणाऱ्या महान विचारसरणी आणि राष्ट्र उभारणीच्या आदर्शांचे जन्मस्थान आहे.

**<u>लाल किल्ला स्फो</u>**

दिल्लीच्या लाल किल्ला परिसरात गेल्या वर्षी १० नोव्हेंबर रोजी झालेल्या बॉम्बस्फोटाच्या कटात सामील असलेल्या आणखी दोन जणांना राष्ट्रीय तपास यंत्रणेनं अटक केली आहे. या प्रकरणात अटक झालेल्यांची संख्या अकरा झाली आहे. जमीर अहमद अहंगर आणि तुफैल अहमद भट अशी त्यांची नावं असून, ते

जम्मू आणि काश्मीरमधील रहिवासी आहेत. हे दोघंही या कटात सक्रियपणे सहभागी होते आणि त्यांनी स्फोट प्रकरणातील मुख्य आरोपीला शस्त्रे पुरवली होती, याशिवाय इतर दहशतवादी कारवायांमध्येही त्यांचा सहभाग असल्याचं तपास यंत्रणेनं म्हटलं आहे.

**<u>पंतप्रधान इन्स्टाग्राम</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी इन्स्टाग्रामवर १० कोटी फॉलोअर्सचा ऐतिहासिक टप्पा ओलांडला आहे. या समाज माध्यमावर हा टप्पा गाठणारे ते पहिले जागतिक नेते आणि राजकारणी बनले आहेत. त्यांचे इंस्टाग्रामवर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यापेक्षा दुप्पट फॉलोअर्स आहेत.

**<u>स्वातंत्र्यवीर सावरकर</u>**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या पुण्यातिथीनिमित्त केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी त्यांना आदरांजली अर्पण केली आहे. स्वातंत्र्यासाठी इंग्रजांच्या विरोधात लढा देणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी आपल्या क्रांतिकारी विचारांनी तरुणांना प्रेरणा दिली. अस्पृश्यता निर्मूलन, महिलांना शिक्षण यासाठीही त्यांनी काम केलं. त्याग, समर्पण आणि साहसाच्या त्यांच्या गाथा भारतीयांना नेहमीच प्रेरणा देतील, असं शहा यांनी आपल्या समाजमाध्यावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>इराण-अमेरिका अणुचर्चा</u>**

अमेरिकेनं तेहरानच्या तेल व्यापार आणि शस्त्रास्त्र जाळ्यावर नवीन निर्बंध लादले असले तरी, इराण आणि अमेरिकेतील अणुचर्चेची तिसरी फेरी आज जिनेव्हा इथं होणार आहे. दोन्ही देशांचे राजदूत यात सहभागी होणार आहेत. या चर्चेबाबत आपण आशावादी असल्याचं इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी म्हटलं आहे. अमेरिकेनं या प्रदेशात आपली लष्करी उपस्थिती वाढवली आहे. जिनेव्हा चर्चा रद्द झाली तर तणाव आणखी वाढू शकतो, ज्यामुळे पश्चिम आशियामध्ये लष्करी संघर्ष आणि पुन्हा अस्थिरतेचा धोका वाढू शकतो, असा इशारा विश्लेषकांनी दिला आहे.

**<u>जयशंकर- मानवाधिकार परिषद</u>**

दहशतवाद हा मानवी हक्कांच्या सर्वात गंभीर उल्लंघनांपैकी एक आहे आणि त्याचे कोणतेही समर्थन असू शकत नाही. भारतानं संघर्षावर संवाद, विभाजनावर सहमती आणि संकुचित हितसंबंधांवर मानवकेंद्रित विकास यावर सातत्यानं भर दिला आहे, असं परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. मानवाधिकार परिषदेच्या ६१ व्या सत्रात ते काल बोलत होते. भारत मानवी क्षमता विकसित करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहे. देशाच्या डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, डीपीआयमुळे लाखो लोकांना विविध लाभ मिळाले असून, सरकारी योजनांचा सहजपणे फायदा घेणं शक्य झालं असल्याचंही त्यांनी यावेळी सांगितलं.

**<u>रेल्वे</u>**

भारतीय रेल्वेनं होळीच्या सणामुळे प्रवाशांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन पुढील महिन्याच्या १८ तारखेपर्यंत विविध रेल्वे विभागांमध्ये एक हजार २४४ होळी विशेष गाड्या चालवण्याचा

निर्णय घेतला आहे. मागणी वाढल्यास ही संख्या वाढू शकते. या विशेष गाड्या देशभरातील प्रमुख शहरे, राज्यांच्या राजधान्या आणि महत्त्वाच्या प्रादेशिक केंद्रांना जोडतील, असं रेल्वे मंत्रालयानं म्हटलं आहे.

**क्रिकेट**

टी-२० विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत सुपर ८ च्या फेरीत आज चेन्नईत भारताचा सामना झिम्बाब्वेशी होणार असून उपांत्य फेरीच्या दृष्टीनं हा सामना अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. सध्या गट एकमध्ये भारत अत्यंत कमी सरस धावगती राखत तिसऱ्या स्थानावर आहे. कोलंबोत काल झालेल्या सामन्यात न्यूझीलंडनं श्रीलंकेचा ६१ धावांनी पराभव केला. या विजयासह, न्यूझीलंड उपांत्य फेरीच्या दिशेने एक पाऊल पुढे गेले आहे. सध्या गट एकमध्ये वेस्टइंडिज पहिल्या तर दक्षिण आफ्रिका दुसऱ्या , झिम्बाब्वे चौथ्या स्थानावर आहे. या फेरीत भारतीय संघाचे झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिजविरुद्धचे सामने अद्याप बाकी आहेत. उपांत्यफेरीत पोहोचण्यासाठी भारताला मोठ्या फरकाने विजय आवश्यक आहे. शिवाय इतर संघांच्या जय-पराजय आणि सरस धावगतीवर भारताला अवलंबून राहावं लागणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार